# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## महाराष्ट्र वनसेवा (मुख्य) परीक्षा-२०१४

**अधिसूचना क्रमांक** एमएफएम-१६१४/सीआर-१६/२०१५/बारा **जाहिरात क्रमांक - ६०/२०१५**

जाहिरात क्रमांक ६३/२०१४, दि.१२ फेब्रुवारी, २०१४ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील सहायक वन संरक्षक, गट-अ संवर्गातील १० पदे व वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गातील २७२ पदांवरील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. **२७** एप्रिल, **२०१४** रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वनसेवा (पूर्व) परीक्षा-२०१४ रोजीच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र वनसेवा (मुख्य) परीक्षा-२०१४ **रविवार, दिनांक ९ ऑगस्ट, २०१५** रोजी फक्त **मुंबई** येथे घेण्यात येईल. पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जाव्दारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| **१. सहायक वनसंरक्षक गट-अ, एकूण पदे १०** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| | -- | २ | १ | -- | -- | -- | -- | २ | ५ | ५ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | ३ | ४ | ७ |
| (२) महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | १ | ३ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **२. वनक्षेत्रपाल गट-ब, (एकूण २७२ पदे)** | | | | | | | | | | | |
| | ४० | १३ | ९ | ८ | ३ | २ | ३ | ३६ | ११४ | १५८ | २७२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | २५ | ८ | ७ | ५ | २ | १ | ३ | २३ | ७४ | १०२ | १७६ |
| (२) महिला | १२ | ४ | २ | ३ | १ | १ | -- | ११ | ३४ | ४८ | ८२ |
| (३) खेळाडू | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | ६ | ८ | १४ |

२.१ उपरोक्त पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२००० /प्र.क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.३ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही १०१२/प्र.क्र. १६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.४ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार अपलब्ध न झाल्यास वि.जा.(अ) , भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीपैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

२.५ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांना देय असलेली वय / परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी / निकषांसंदर्भात उमेदवाराने सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

२.६ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.

२.७ खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदाच्या मुलाखतीपूर्वी क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

२.८ प्रस्तुत भरतीकरिता महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० लागू आहे.

२.९ शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एफटीआर १५/०४/प्र.क्र.१३६/फ-४, दि. १० फेब्रुवारी, २००९ नुसार प्रस्तुत पदांकरीता अपंग उमेदवार पात्र नाहीत.

२.१० सहायक वनसंरक्षक, गट-अ व वनक्षेत्रपाल गट-ब पदावर निवड झालेल्या उमेदवारास प्रशिक्षण कालावधीमध्ये शासनाच्या निश्चित केलेल्या दराने दरमहा विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

**३. परीक्षेचे टप्पे**

सदर परीक्षा खालील दोन टप्प्यात घेण्यात येईल :-

(१) लेखी परीक्षा :- ४०० गुण. (२) मुलाखत :- ५० गुण

**४. पात्रता :-**

४.१ **भारतीय नागरिकत्व.**

४.२ **वयोमर्यादा** :-

४.२.१ दिनांक **१ जून, २०१४** रोजी किमान १८ वर्षे असावे व ३३ वर्षांपेक्षा (मागासवर्गांकरिता ३८ वर्षांपेक्षा) जास्त नसावे.

४.२.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.२ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.३ माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

४.३.४ वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एकच अधिकतम सवलत लागू राहील.

४.३ **शैक्षणिक अर्हता :-**

४.४.१ संविधिक विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या, पशुवैद्यकीय शास्त्र या विषयांपैकी कमीत कमी एका विषयाचा पदवीधर किंवा कृषि, अभियांत्रिकी यातील पदवीधारक.

४.४.२ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

४.५ **शारीरिक मानके :-**

४.५.१ शारीरिक मोजमापे :-

| उमेदवाराचा प्रवर्ग | उंची | छातीचा घेर (न फुगवता) | फुगविण्याची क्षमता |
|---|---|---|---|
| पुरुष उमेदवार | १६३ सें.मी. | ७९ सें.मी. | ५ सें.मी. |
| स्त्री उमेदवार | १५० सें.मी. | -- | -- |
| अनुसुचित जमातीमधील उमेदवारांच्या बाबतीत खालीलप्रमाणे शिथिलक्षम | | | |
| पुरुष उमेदवार | १५२.५ सें.मी. | ७९ सें.मी. | ५ सें.मी. |
| स्त्री उमेदवार | १४५ सें.मी. | -- | -- |

४.५.२ सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन) ४ + OD सह प्रत्येक डोळयाची दृष्टीतीक्ष्णता (व्हिज्युअल ॲक्विटी) ६/६ असावी. बाहय डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

४.५.३ पुरुष व महिला उमेदवारामध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक असेल.

४.५.४ प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. तसेच वैदयकीय चाचण्या घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास व वैदयकीय चाचणीमध्ये पात्र न ठरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**५. शुल्क :-**

५.१ अमागास- रुपये ५१५/- ५.२ मागासवर्गीय - रुपये ३१५/-

**६. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

६.१ महाराष्ट्र वनसेवा (पूर्व) परीक्षा – २०१४ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक २९ जून, २०१५** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.२ पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते, परंतु दिनांक **दिनांक २९ जून, २०१५** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**७. अर्ज करण्याची पध्दत :-**

७.१ प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने विहित माहिती स्वीकारण्यात येईल.

७.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन माहिती https://mahampsc.mahaonline.gov.in वेबसाईटव्दारे **दिनांक १५ जून, २०१५ ते २९ जून, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

७.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज/माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www. mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

७.४ विहित पध्दतीने आयोगास माहिती सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

७.५ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खाली नमूद केलेल्या पध्दतींचा अवलंब करावा :-

७.५.१ मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

७.५.२ " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर **माझे ॲप्लीकेशन** सदरातील **स्पर्धात्मक परीक्षा** या लिंक वर क्लिक करावे.

७.५.३ **स्पर्धात्मक परीक्षा** या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरण्याच्या/न भरण्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "pay now" अशी लिंक उपलब्ध असेल.

७.५.४ "pay now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील :- (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाव्दारे

७.५.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

७.५.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

७.५.७ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

७.५.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज/माहिती सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज /माहिती सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

७.५.९ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

७.५.१० मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**८. प्रवेशप्रमाणपत्र:-**

८.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**९.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत " उमेदवारांना सर्वसाधारण सूचना " तसेच परीक्षा या विभागातील "महाराष्ट्र वनसेवा परीक्षा " मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया उवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१०.** विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकींगव्दारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक २९ जून, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**११.** चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ३० जून, २०१५** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**१२.** प्रस्तुत मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१३.** सदर अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in / https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई
दिनांक :- **१५ जून, २०१५**

श्री.शं. पाठक
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१)आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

(२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.